**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **आगामी वर्षात देश नवी आशा आणि संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचं पंतप्रधानांचं मन की बात कार्यक्रमात प्रतिपादन.**
2. **मुंबई महानगरपालिकेसाठी काँग्रेस आणि 'वंचित'ची आघाडी; इतर महापालिकांचा निर्णय स्थानिक पातळीवर घेणार.**
3. **महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाद्वारा अपक्ष उमेदवारांसाठी तब्बल १९४ चिन्ह उपलब्ध.**
4. **विदर्भात किमान तापमानात सातत्याने घट; नागपुरात नऊ पूर्णांक आठ दशांश अंश इतक्या किमान तापमानाची नोंद.**

मन कि बात

नव्या वर्षात नवीन आशा आणि नवीन संकल्पांसोबत भारत प्रवेश करणार आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधत होते. हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग होता. २०२५ या वर्षाने प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावणारे क्षण दिल्याचं सांगून त्यांनी देशवासियांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सरत्या वर्षातील प्रमुख घटनांचा उल्लेख करतांना ऑपरेशन सिंदूर, प्रयागराज महाकुंभ मेळा, भारतीय महिला संघाचा क्रिकेट विश्वचषक विजय या प्रमुख घटनांबद्दल त्यांनी सांगितलं. त्यांनी देशापुढे आलेल्या नैसर्गिक आपत्तीचाही उल्लेख केला. स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या यशस्वी आयोजनाच्या त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. आतापर्यंत या हॅकेथॉन मध्ये ६ लाखांवर युवकांनी सहभाग घेतल्याचं ते म्हणाले. दुबईतील कन्नड शाला उपक्रमाचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. मणिपूरच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा, काशी-तमिळ संगमम उपक्रमांचा देखील उल्लेख केला. फिट इंडिया चळवळीबद्दल सांगत हिवाळा हा सुदृढ आरोग्यासाठी पोषक असून व्यायाम आणि आहारावर लक्ष केंद्रित करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं. त्यासोबतच,

वेदनाशामक ॲंटिबायोटिक्स गोळ्या वारंवार घेण टाळावं असंही पंतप्रधान म्हणाले.

***Indian Council of Medical Research ने हाल ही में एक report जारी की है | इसमें बताया गया है कि निमोनिया और UTI जैसी कई बीमारियों के खिलाफ antibiotic दवाएं कमजोर साबित हो रही हैं | हम सभी के लिए यह बहुत ही चिंताजनक है | report के मुताबिक इसका एक बड़ा कारण लोगों द्वारा बिना सोचे-समझे antibiotic दवाओं का सेवन है | antibiotic ऐसी दवाएं नहीं हैं, जिन्हें यूं ही ले लिया जाए | इनका इस्तेमाल Doctor की सलाह से ही करना चाहिए | मैं आप सभी से आग्रह करता हूँ अपनी मनमर्जी से दवाओं का इस्तेमाल करने से बचें |***

आपल्या पारंपरिक कला या समाजाच्या सक्षमीकरणासह, लोकांच्या आर्थिक प्रगतीचं मोठं माध्यम बनल्याचं सांगून, त्यांनी याबाबत देशभरात सुरु असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली. २०२५ मधला हा 'मन की बात' चा शेवटचा भाग असल्याचं नमूद करून, २०२६ हे वर्ष 'विकसित भारत' या संकल्पाच्या पूर्ततेच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा ठरो अशी कामना पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

कॉंग्रेस आणि 'वंचित'ची आघाडी

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात आज आघाडीचा निर्णय झाला. मुंबईत वंचित बहुजन आघाडी ६२ जागा लढणार आहे. राज्यातील इतर २८ महानगरपालिकेतील आघाडी संदर्भात स्थानिक पातळीवर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. आज कॉंग्रेस पक्षाच्या स्थापना दिनी कॉंग्रेसचे मुख्यालय टिळक भवन, मुंबई इथं कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि 'वंचित बहुजन आघाडी'चे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांनी आघाडीची घोषणा केली. कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांची युती ही नैसर्गिक युती आहे असं सपकाळ यावेळी म्हणाले -

***कॉंग्रेस आणि बाळासाहेब आम्ही सोबत निवडणुकांमध्ये होतो. 1998 ला आघाडी होती 1999 ला कॉंग्रेस दुभंगल्या गेली तशा बाकी या परिस्थितीत ही आदरणीय बाळासाहेब आंबेडकर जी आमच्यासोबत राहिले. मात्र त्यानंतर 99 नंतर 2025 लाख पुन्हा एकदा दोन पक्ष हे समविचारीच्या पलीकडे जाऊन मित्रपक्ष म्हणून***

***25 वर्षांनंतर होत असणाऱ्या या आघाडी ची घोषणा करत असताना मला आर्थिक स्वरूपाचा आनंद आहे, काँग्रेस आणि वंचित दोन नैसर्गिक पार्टनर्स आहे तर नैसर्गिक का आहे तर संविधानाला अभिप्रेत असताना भारत घडविणे हा आमचा पण पॉलिटिकल अजेंडा आहे आणि वंचित चा देखील तोच पोलिटिकल अजेंडा आहे.***

देश विघातक भाजपला रोखण्यासाठी दोन्ही पक्ष एकत्र आले असल्याचं प्रतिपादन वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. पुंडकर यांनी यावेळी केलं. मुंबई महापालिकेसाठी आज आघाडी जाहीर करण्यात आली असून इतर महानगरपालिकेत दोन्ही पक्षांचे स्थानिक नेतृत्व सकारात्मक निर्णय घेईल, असं वंचितचे सिद्धार्थ मोकळे म्हणाले.

निवडणूक चिन्हे

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान राज्य निवडणूक आयोगाने अपक्ष उमेदवारांसाठी तब्बल १९४ चिन्ह उपलब्ध करून दिली आहेत. यामध्ये विविध चिन्हाचासमावेश असून, यात खाद्यपदार्थांच्या चिन्हांचाही वापरण्यात आला आहेत. यात सफरचंद, बिस्कीट, पाव, केक, ढोबळी मिरची, फुल कोबी, नारळ, ऊस, जेवणाची थाळी इत्यादी चिन्हांचा समावेश आहे. निवडणूक लढविणाऱ्या अपक्ष उमेदवारांना तसेच 'अ' मान्यता प्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना या मुक्त चिन्हामधून निवड करता येणार आहे. मात्र मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्या राखीव चिन्हांवरच उमेदवार उभे करण्याची मुभा राहणार असून, मुक्त चिन्हांची यादी त्यांना लागू राहणार नाही. राज्य निवडणूक आयोगाकडे अमान्य प्राप्त पण नोंदणीकृत अशा ४१६ पक्षानी नोंदणी केली आहे. त्यांना मान्यताप्राप्त पक्ष श्रेणीतील राखीव चिन्हे न देता स्वतंत्र चिन्हे दिली जाणार आहेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने एकूण १९ राजकीय पक्षांची चिन्हे राखून ठेवली आहेत. अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरताना तीन मुक्तचिन्हे नमूद करणे बंधनकारक असून वाहन आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची चिन्हे देखील मुबलक आहेत.

पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची राष्ट्रवादी काँग्रेसशी युतीची बोलणी फिसकटल्यानंतर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमधे आघाडीचे प्रयत्न सुरू असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अंकुश काकडे यांनी सांगितलं. या आघाडीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि वंचित बहुजन आघाडीलाही सामावून घेण्याची आपल्या पक्षाची तयारी असल्याचं काकडे यांनी सांगितल्याचं हिंदुस्तान समाचार या वृत्तसंस्थेच्या वृत्तात म्हटलं आहे. आज पहाटेपर्यंत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली.

डॉ.नीलम गोरे

शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे यांनी २५ उमेदवारांची प्रभागनिहाय यादी मंत्री उदय सामंत यांना दिली असल्याचं देखील या संस्थेनं सांगितलं. शिवसेना २५ जागांवर ठाम आहे असं डॉ.नीलम गोऱ्हे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. भाजपने देऊ केलेल्या १५ जागा शिवसेनेला मान्य नाही. नगरपरिषद निवडणुकीत मिळालेल्या विजयानुसार १६५ पैकी आम्हाला सरासरी ४७ जागा मिळणे अपेक्षित होते पण आम्ही २५ जागा मागितल्या असून, त्या भाजपने देणे आवश्यक आहे. महापालिका निवडणुकीत सन्मानजनक युती व्हावी, ही शिवसैनिकांची अपेक्षा आहे, असं गोऱ्हे म्हणाल्या.

विकसित भारत

विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र सरकारनं यावर्षी विविध उपक्रम राबवले आहेत. नव्या भारताच्या उभारणीसाठी हे बदल महत्वपूर्ण ठरले- ऐकुया याविषयी अधिक माहिती -

***भारताच्या विकासाच्या प्रवासात २०२५ हे वर्ष अतिशय महत्त्वाचं ठरलं. रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक, सागरी वाहतूक अशा सर्व क्षेत्रांमधल्या पायाभूत सुविधांमधे यावर्षी मोलाची भर पडली. दुर्गम भागापासून मोठ्या शहरांपर्यंत संपर्काचं जाळं तयार झालं. पायाभूत सुविधांसाठी सरकारने केलेली भांडवली गुंतवणूक चालू आर्थिक वर्षात सव्वा अकरा लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.***

*याचा जीडीपीमधला वाटा ३ पूर्णांक एक दशांश टक्के आहे.  या वर्षात आर्थिक वाढीमधे पायाभूत सुविधांचा वाटा महत्त्वाचा राहिला. नवी मुंबईमधल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासह १६०पेक्षा जास्त नवीन विमानतळं, तमिळनाडूमधला समुद्री पूल, नौदलामधल्या पायाभूत सुविधा, ९९ टक्के रेल्वेंचं विद्युतीकरण अशा अनेक पायाभूत सुविधांची या वर्षात भर पडली. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नमता फलके)*

क्रिकेट

महिला टीट्वेंटी क्रिकेटमध्ये, भारत - श्रीलंका यांच्यातल्या पाच सामन्यांच्या मालिकेतला चौथा सामना आज केरळमध्ये तिरुअनंतपुरम इथल्या ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं ५ सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी आघाडी घेतली आहे.

सचिव परिषद

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत सुरू असलेल्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेचा आज समारोप होत आहे. राज्य आणि केंद्र भागीदारी मजबूत करणं हे याचं उद्दिष्ट आहे.

हवामान

विदर्भात तापमानाचा पारा सातत्याने घसरत आहे. गोंदिया जिल्ह्यात आज नऊ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली, तर नागपुर इथं किमान तापमानात घट होऊन नऊ पूर्णांक आठ दशांश अंश तापमान नोंदवल गेल. वर्धा इथं 11, भंडारा येथे दहा, चंद्रपूर आणि गडचिरोली इथं बारा पूर्णांक दोन, यवतमाळ येथे दहा पूर्णांक चार आणि अमरावती इथं 11.5 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. दरम्यान वाशीम येथे 31 अंश इतकं सर्वाधिक कमाल तापमान नोंदवल गेल.

*****